**MHKO120005432016**

## निशाण क्रमांक ३१ वरील आदेश.

( सागर राणे वि. बाजीराव राणे )

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०१ नियम १० अन्वये प्रतिवादी क्र.१ यांना दावेतून कमी करणेसाठी केलेला आहे.

०२. वादीयांचे कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ बाजीराव रामचंद्र राणे हे मयत झाले आहेत त्यामुळे त्यांच्या विरूध्द आता कोणतीही दादा मागण्याची नाही. तसेच, त्यांचे वारस वादी व प्रतिवादी क्र.३ हे या आधिच पक्षकार म्हणून सामिल असल्यामुळे, प्रतिवादी क्र.१ यांना दाव्यातून कमी करण्याबाबत आदेश होणेची विनंती केली आहे.

०३. प्रतिदींनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज चालण्यासा पात्र नसल्यामुळे योग्य ते आदेश होण्याची विनंती केली आहे.

०४. दोन्ही बाजुच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखावरील दाखल सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०५. प्रस्तुत प्रकरणामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ०१ नियम १० ची तरतुद पहाणे गरजेची आहे. ती पुढील प्रमाणे,

" दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ०१ नियम १०(२) मधील तरतूदीनुसार न्यायालय कुठल्याही प्रक्रियेच्या टप्पयात कुठल्याही पक्षकारांनी केलेल्या अर्जाद्वारे किंवा अर्ज न सादर करता त्यास प्रक्रिये दरम्यान पक्षकार म्हणून समावेश करता येतो किंवा अनावश्यक पक्षकारास कमी करता येते, मग तो वादी असेल किंवा प्रतिवादी असेल आणि प्रकरणात उद्गलेले सर्व प्रश्नांचा संपूर्णपणे व परिणामकारकरितीने त्या पक्षकारांच्या समस्यांना न्याय देता येईल. "

०६. मान्य परिस्थितीनुसार असे म्हंटले जाते की, वादी हा आपल्या दाव्याचा मालक असतो. घटनेशी संबंधीत इसमांना वादी हा दाव्यामध्ये पक्षकार करु शकतो किंवा त्यांना दाव्यातून कमी करू शकतो. वादीच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी

क्र.१ हे मयत झाले आहेत. तसेच, त्यांचे वारस हे या आधिच पक्षकार म्हणून सामिल असल्यामुळे, त्यांना दाव्यातून कमी केल्यास कोणतेही नुकसाण होणार नाही किंवा दाव्याच्या स्वरुामध्ये कोणताही फरक पडणार नाही. उपरोक्त सर्व कारणमिमांसेवरून, न्यायाचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी, खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी अर्जात नमुद केल्या प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करावी.

३. वादी यांनी मुदतीत दुरुस्त दाव्याची प्रत हजर करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2022.07.05 17:34:57 +0530

स्थळ : गारगोटी. ( **व्ही. बी. मुल्ला** )

दिनांक : ०५/०७/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.